# प्रकरण चौथे

# प्रकरण ४
# सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या समस्या

## ४.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे थोडक्यात पुर्नलोकन केले आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या रचनेला केंद्रापासून ते स्थानिक पातळी पर्यंत महत्व आहे. कारण गरीबीची ओळख करून घेणे, आवश्यक वस्तूंचा पुरवठा गरिबांना करणे व त्यासाठी अन्नधान्याची व इतर वस्तूंची विविध महामंडळाकडून खरेदी अशी आव्हानात्मक कार्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेला करावी लागतात. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे महत्वाचे कार्य म्हणजे सर्व महामंडळात महत्वाची भूमिका पार पाडावी लागते. अन्नसुरक्षिततेच्या धोरणात सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका महत्वाची आहे. देशातील लोकांचे रहाणीमान/पोषण चांगले करण्यास सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत उत्तम प्रतिच्या वस्तू पुरविल्या पाहिजेत तथापि, परिणामकारक व्यवस्थापनाअभावी केंद्रापासून स्थानिक पातळीपर्यंत सार्वजनिक वितरण व्यवस्थेत अनेक समस्या आहेत.

## ४.२ कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील समस्या

कागल तालुक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ही यंत्रणा उभारली आहे. सरकारमान्य असलेल्या पुरेशा साठ्यातून या तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांना पुरवठा होतो. वाटपाची यंत्रणा राज्य सरकार करीत आहे. प्रत्येक कुटुंबाला त्याच्या उत्पन्नानुसार शिधापत्रिकेचे वाटप केले आहे. घरातील व्यक्तिंच्या संख्येप्रमाणे एकक ठरवून दिली आहेत. सरकारने जाहिर केल्याप्रमाणे शिधापत्रिकेवर ठराविक किंमतीला

वेळेत न होणे, कामात दिरंगाई, वाटपात भेदभाव इ. दोष व्यवस्थापन कार्यात दिसून येतात. ६० टक्के कार्डधारकांनी व्यवस्थापन कार्यक्षम नाही असे सांगितले आहे. कार्डावरील व्यक्तिंच्या नोंदी कमी अधिक करून ताबडतोब मिळत नाहीत असे ६० टक्के कार्डधारकांच्या बाबतीत घडले आहे. कार्डावरील नोंदी कमी करणे अथवा अधिक करणे तसेच नविन रेशन कार्ड काढणेस अथवा रेशन कार्ड हरविल्यास दुबार मिळणेस जवळ जवळ ३ ते ४ महिन्याचा कालावधी लागतो असे संशोधनात दिसून आले आहे. त्यामुळे अकार्यक्षम व्यवस्थापन ही एक महत्वाची समस्या आहे.

### ४.३.३ अपूरा अन्नधान्याचा पुरवठा

कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविला जाणारा अन्नधान्याचा पुरवठा अपूरा आहे. केशरी कार्डधारकांसाठी प्रति कार्ड गहू व तांदूळ फक्त ५ किलो मिळतो. तो ही एक महिन्यात मिळतो तर पुढचे दोन महिने मिळतच नाही असे दिसून आले आहे. तर दारिद्रय रेषेखालील व अंत्योदय योजनेच्या कार्डधारकांनाही अपूरा अन्नधान्य पुरवठा होतो. फक्त गहू, तांदूळ व रॉकेल याच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही वस्तू सार्वजनिक वितरणातून पुरविल्या जात नाहीत. केशरी कार्डधारकांना गरजेच्या ९८ टक्के अन्नधान्य व आवश्यक वस्तू बाहेरून घ्याव्या लागतात तर दारिद्रय रेषेखालील कार्डधारकांना गरजेच्या ७१ टक्के वस्तू व अन्नधान्य खुल्या बाजारातून विकत घ्यावे लागते. त्यामुळे बरेच लोक सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर नाराज असल्याचे दिसून येते. कार्डधारकांना गहू व तांदुळ याबरोबर साखर, कडधान्य, तेल इ. दैनंदिन वस्तू मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत होणारा पुरवठा अपूरा आहे असे आढळून आले.

### ४.३.४ चांगल्या दर्जाच्या अन्नधान्याचा अभाव

कागल तालुक्यातील संशोधनात वितरण व्यवस्थेमार्फत वाटप होणारे अन्नधान्य हे कनिष्ठ दर्जाचे असते असे आढळून आले. ६९ टक्के

वशिलेबाजीतून काम करतो असे दिसून येते. काही वेळा रेशन दुकान महिन्यातून बऱ्याचदा बंद ठेवले जाते. यामुळे ज्या कार्डधारकांना धान्य खरेदी करायचे आहे त्यांना दुकान कोणत्या दिवशी व कधी उघडणार याची वाट पहात बसावे लागते. त्यामुळे कार्डधारकांच्या वेळेचा अपव्यय होतो.

## ४.३.७ साठवणूकीच्या सोयी अपूऱ्या

कागल तालुक्यातील एकूण सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा विस्तार पाहिला असता गोदामाच्या सोईचा अभाव दिसून येतो. एकूण संपूर्ण कागल तालुक्यात फक्त एकच गोडावून आहे. त्यामध्ये ही साठवणूकीची सोय योग्य दिसत नाही. धान्याची गळती, उंदीर, घुशी यांच्यापासून धान्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होताना दिसते. तसेच आळी, मुंग्या, टोके यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. त्यामुळे धान्याची नासाडी होत आहे व असे धान्य कार्डधारकांना पुरवठा होणे हे कार्डधारकांच्या आरोग्याला घातक ठरू शकते. तसेच रेशन दुकानदार ज्या ठिकाणी माल ठेवतात तिथेही काही ठिकाणी उंदीर, घुशी, मुंग्या, किडे व टोके यामुळे धान्याची नासाडी होताना दिसून आली. यामुळे धान्य साठवणूक व्यवस्था योग्य आहे असे म्हणता येणार नाही. धान्य सुरक्षित ठेवण्यासाठी योग्य ती उपाययोजना केली जात नाही असे दिसून येते.

## ४.३.८ अनियमित अन्नधान्याचा पुरवठा

कागल तालुक्यातील वितरण व्यवस्थेची कार्यप्रणाली पाहिली असता. कार्डधारकांना होणारा अन्नधान्याचा पुरवठा अनियमित आहे. प्रत्येक महिन्याच्या ठराविक तारखेला अन्नधान्य व आवश्यक वस्तू यांचा पुरवठा केला जात नाही. कधी महिन्याच्या ५ तारखेला तर कधी १५ तारखेला रेशनिंगवरील वस्तू पुरविल्या जातात. त्यामुळे कार्डधारकांची हेळसांड होताना दिसून आली. तर काही रेशन दुकाने चार ते पाच दिवसच चालू ठेवतात असे दिसून आले. त्यामुळे कार्डधारकाला पैशाअभावी रेशनिंगचा माल घेता येत नाही रॉकेलच्या बाबतीत ही असेच होते. रॉकेल वाटप साधारणपणे दोन ते तीन दिवसच चालू

### ४.३.११ रेशन दुकानांची संख्या अपूरी

कागल तालुक्यातील लोकसंख्येच्या मानाने रेशन दुकानांची संख्या अपूरी असल्याचे आढळते. त्यामुळे अधिक कार्डधारकांचा भार एका रेशन दुकानावर पडतो. त्यामुळे व्यवस्थापनात अकार्यक्षमता व गोंधळ निर्माण होतो. अन्नधान्य वितरणावेळी रांगा लावाव्या लागतात. तसेच अनुचित प्रकार घडून येण्याची शक्यता असते. त्यामुळे रेशन दुकानांची अपूरी संख्या ही एक महत्वाची समस्या आहे. कागल तालुक्यातील एकूण कार्डधारकांची संख्या ५६२१६ इतकी आहे मात्र रेशन दुकानांची संख्या फक्त ९४ इतकी आहे. त्यामुळे कागल तालुक्यात रेशन दुकानांचा अपुरेपणा दिसून येतो.

### ४.३.१२ राजकिय गटांचा हस्तक्षेप

सार्वजनिक वितरण व्यवस्था ही देशातील गरीब जनतेचे कुपोषणापासून व महागाई पासून संरक्षण करण्यासाठी कार्य करत आहे. मात्र कागल तालुक्यातील वितरण व्यवस्था पाहिली असता सार्वजनिक वितरण व्यवस्थेत राजकिय गटांचा हस्तक्षेप होताना दिसून येतो. काही रेशन दुकाने एका विशिष्ट राजकिय गटाची व काही रेशन दुकाने दुसऱ्या गटाची आहेत असे दिसून आले. तर राजकिय गट हे आपल्या गटातील व्यक्तिंची नावे कशी दारिद्रच रेषेखाली लावली जातील आणि सार्वजनिक वितरणाचा आपल्या गटाला कसा फायदा होईल याकडे लक्ष पुरवित असल्याचे दिसून येते.

### ४.३.१३ भांडवलाचा अभाव

कागल तालुक्यातील ३ टक्के रेशन दुकाने भांडवला अभावी रेशनवरचा माल तालुक्याकडूल उचल करीत नाहीत असे आढळून येते. काही रेशन दुकाने संस्थेकडे भांडवल कमी असल्यामुळे एखाद्या महिन्यात तालुक्यातील संपूर्ण कार्डधारकांसाठी मिळणारा माल उचल केला जात नाही. त्यामुळे कार्डधारकांना योग्य प्रमाणात अन्नधान्याचा पुरवठा होत नाही. त्यामुळे तालुक्याला माल

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## ४.४ सारांश

वरील सर्व समस्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेत जरी असल्या तरी कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेने गरीब जनतेसाठी कमी किंमतीत महत्वाच्या अन्नधान्याचा पुरवठा करून महत्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे गरीबांना जगण्यासाठी थोडाफार का होईना दिलासा मिळाला आहे.